134

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०१/०९/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- १०२२/ प्र. क्र.१५३/ विशा-३(अ), दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** महाराष्ट्र राज्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (Anti Narcotics Task Force ANTF) स्थापन करण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- १०२२/ प्र. क्र.१५३/ विशा-३ (अ), दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०८३११२१५३६९३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**महाराष्ट्र राज्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (Anti Narcotics Task Force ANTF) स्थापन करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१०२२/प्र.क्र.१५३/विशा-३(अ)**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दि.३१ ऑगस्ट,२०२३

**संदर्भ:-**

१. भारत सरकार गृह विभाग, नवी दिल्ली यांचे आदेश क्रमांक १-१२०२३/०२/२०१७ / NCB II (VoII), दि. २५/०३/२०२२
२. महानिदेशक, स्वापक नियंत्रण ब्युरो, नवी दिल्ली यांचे अ.शा. पत्र क्र.III/एन्कोर्ड-८वीं एपेक्स/समन्वय/२०२२/१०७, दि.१९/०१/२०२३
३. महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे आदेश क्र. NDP ०४०४ / २३५/CR-९/SPL-३(A), दि.०५.०८.२००६
४. महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे आदेश क्र. NDP १००० / २३५ /CR-१०/SPL-३(A), दि.०६.०१.२००७

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यात अलिकडच्या काळात अंमली पदार्थाची विक्री, वितरण आणि गैरवापर करणाऱ्या प्रवृत्तीत वाढ झाल्याचे दिसून आले आहे. अंमली पदार्थाचा दुरुपयोग राज्याच्या प्रगतीशील आणि गतिमान अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम करत आहेत. तसेच अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या राज्यातील तरुणांच्या सामाजिक, आर्थिक स्तरावर आणि शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. तसेच त्याचे परिणाम अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या तरुणाच्या कुटुंबियानांदेखिल भोगावे लागत आहेत.

२. केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ व २ आदेशान्वये महाराष्ट्र शासनास प्रत्येक राज्यामध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्याबाबत निर्देश दिले आहेत. याअनुषंगाने महाराष्ट्र राज्यात पोलीस महासंचालक यांच्या मार्गदर्शन व अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पूणे यांच्या नियंत्रण आणि देखरेखीखाली विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अधिपत्याखाली अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णयः-**

महाराष्ट्र राज्यात पोलीस महासंचालक यांचे मार्गदर्शन व अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नियंत्रण व देखरेखीखाली विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अधिपत्याखाली अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

**(अ) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापनेचा उद्देश :-**

१. अवैध अंमली पदार्थ यांची विक्री, पुरवठा आणि वितरण यामध्ये गुंतलेल्या सर्वांवर प्रभावी फौजदारी कारवाई करणे.

२. अवैध अंमली पदार्थ सेवन करण्याची सवय लागलेल्या व्यक्तींचे पुनर्वसन करणे.

३. अवैध अंमली पदार्थांच्या सेवनाच्या दुष्परिणामाबाबत मोठया प्रमाणात जनजागृती करणे.

४. अवैध अंमली पदार्थांच्या वाहतुक आणि वितरण रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

५. वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केंद्रीय यंत्रणा व राज्य स्तरीय यंत्रणा यांमध्ये समन्वय ठेवणे.

**(आ) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सची संरचना :-**

अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे प्रमुख हे विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी असतील. सदर टास्क फोर्सचे मुख्यालय हे गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सध्याच्या मुख्यालयात असेल. त्यांच्या अधिपत्याखाली पोलीस उप महानिरीक्षक दर्जाचे पद मुख्यालयात कार्यरत असेल. पोलीस उप महानिरीक्षक यांच्या अधिपत्याखाली पोलीस अधीक्षक, प्रशासन, पोलीस अधीक्षक, कृती पुणे विभाग व पोलीस अधीक्षक, कृती नागपूर विभाग हे असतील.

पोलीस अधीक्षक, (प्रशासन) यांच्या अधिपत्याखाली अपर पोलीस अधीक्षक, (प्रशासन) व पोलीस उप अधीक्षक, (प्रशासन) हे कार्यरत असतील. पोलीस अधीक्षक, (कृती) पुणे विभाग यांच्या अधिपत्याखाली अपर पोलीस अधीक्षक, (कृती) व पोलीस उप अधीक्षक, (कृती) हे कार्यरत असतील. पोलीस अधीक्षक, (कृती) नागपूर विभाग यांच्या अधिपत्याखाली अपर पोलीस अधीक्षक, (कृती) व पोलीस उप अधीक्षक, (कृती) हे कार्यरत असतील.

पोलीस अधीक्षक, (कृती) नागपूर विभाग / अपर पोलीस अधीक्षक,कृती नागपूर विभाग व पोलीस उप अधिक्षक,कृती नागपूर विभाग यांची कार्यालये नागपूर पोलीस आयुक्त कार्यालय येथे असतील. या व्यतिरिक्त इतर पोलीस अधिकाऱ्यांची कार्यालये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या मुख्यालयाच्या ठिकाणी म्हणजेच गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे कार्यरत असतील.

पुणे ANTF विभाग व नागपूर ANTF विभाग अंतर्गत पोलीस उपअधिक्षक (कृती) दर्जाचे अधिकारी त्या त्या जिल्हयात कार्यरत असतील.पुणे व नागपूर उपघटकांअंतर्गत येणाऱ्या जिल्हयांची यादी परिशिष्ट “अ” नुसार असेल.

**(इ) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सची कार्यप्रणाली :-**

१. मा. सर्वोच्च न्यायालय / उच्च न्यायालय, शासन, पोलीस महासंचालक यांच्याकडून वर्ग केलेल्या अथवा सोपविण्यात आलेल्या प्रकरणाचा/ गुन्हयांचा तपास करणे,

२. तसेच प्राप्त तक्रारी / माहितीबाबत शहानिशा करून विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स यांच्या परवानगीने स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करतील. त्याचा पुढील तपास महाराष्ट्र राज्य अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स यांच्या पथकाकडून करण्यात येईल. अशा गुन्हयांचे मार्गदर्शन व नियंत्रण विशेष पोलीस महानिरीक्षक अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स यांच्याकडे राहिल.

३. महाराष्ट्र राज्य अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स राज्यासाठी NCORD (Narco Coordination Centre) सचिवालय म्हणूनही काम करेल आणि NCORD च्या विविध स्तरावर घेतलेल्या निर्णयांच्या पूर्ततेच्या पुढील कार्यवाहीवर लक्ष ठेवतील.

४. ज्या गुन्हयांचे स्वरूप संवेदनशिल व क्लिष्ट आहे, ज्या गुन्हयांची व्याप्ती पूर्ण महाराष्ट्र राज्यात आहे व ज्या गुन्हयांची व्याप्ती महाराष्ट्र राज्याच्या बाहेर आहे अशा गुन्हयांचा तपास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वये विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स यांना देता येईल.

५. इतर अंमली पदार्थ विषयक गुन्हयांचा तपास नेहमीप्रमाणे पोलीस ठाणे किंवा स्थानिक गुन्हे शाखा यांच्याकडून होईल. त्यावर प्रत्येक घटक प्रमुखांचे नियंत्रण राहिल.

६. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे कार्यक्षेत्र मुंबई वगळून संपूर्ण महाराष्ट्र राज्य असेल.

७. अंमली पदार्थ विषयक गुन्हयांची चौकशी व तपास पध्दतीबाबत राज्य पोलीस दलातील अधिकारी/ अंमलदार यांना मार्गदर्शक सूचना व प्रशिक्षण देणे.

८. अंमली पदार्थ विषयक गुन्हे व गुन्हेगार यांचा गुन्हे कार्यप्रणालीनुसार व आयुक्तालय व जिल्हानिहाय वेगवेगळे अभिलेख तयार करुन अद्ययावत करणे तसेच गुन्हयांच्या संकलित माहितीचे विश्लेषण करून स्वयंप्रेरित(Pro Active) उपाययोजना सुचविणे.

९. महाराष्ट्र राज्य अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स चे प्रमुख NCB (Narcotics Control Bureau) साठी सर्वप्रकारच्या अंमली पदार्थाच्या सर्व बाबींवर नोडल अधिकारी म्हणून काम करतील, जसे की, अंमली पदार्थ नियंत्रण योजनेसाठी राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशांना अंमली पदार्थाच्या नियंत्रणाच्या

योजनेस सहाय्य, NFCDA (National Fund for Control of Drug Abuse) चा वापर अवैध अंमली पदार्थ शेती नष्ट करण्याच्या ऑपरेशनमध्ये समन्वयक इ.

१०. अंमली पदार्थाचा व्यापार करणाऱ्या व्यावसायीकांच्या विघातक कृत्यांना अधिक परिणामकारक प्रतिबंध करणे.

११. ड्रग पेडलर्स आणि तस्करांविरूध्द प्रभावी आणि कायदेशीर कारवाई करून अवैध अंमली पदार्थाचा व्यापार व तस्करी नष्ट करणे.

१२. गुन्हयाचा तपास करुन गुन्हेगांराना विशेष न्यायालया समक्ष हजर करणे.

१३. राज्यातील अंमली पदार्थाचा पुरवठा नियंत्रित करणे आणि अंमली पदार्थाचा स्त्रोत शोधुन काढणे.

१४. समाजातील विविध स्तरांमध्ये अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीचे कार्यक्रम आयोजीत करणे.

१५. स्वयंसेवी संस्था व पुनर्वसन केंद्राच्या मदतीने व्यसनाधीन व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

१६. अंमली पदार्थ विषयक गुन्ह्यांचे दोषसिध्दीचे प्रमाणे वाढविणे.

Narcotics Drug and Psychotropic Substance (N.D.P.S.) या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.

१७. Narcotics Drug and Psychotropic Substance (N.D.P.S.) कायद्यातील तरतुदीनुसार जप्त अंमली पदार्थाची विल्हेवाट लावणे.

१८. अटक केलेले व संशयीत व्यक्तीचे डोजीयर्स तयार करणे.

१९. अंमली पदार्थांच्या संबधात केंद्र सरकारने अधिकृत राजपत्रात निर्दिष्ट केलेल्या औषधातील प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात अंमली पदार्थ आढळणाऱ्या प्रकरणाची चौकशी करुन पुढील कारवाई करणे.

२०. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स यांच्याकडून दाखल गुन्हयातील आरोपीच्या मालमत्तेबाबत एन. डी.पी.एस. कायद्यातील कलम ६८(१) नुसार कारवाई करणे.

२१. आरोपी विरूध्द (Prevention of Ilicit Traffic in Narcotic Drugs and Psychotropic Substances Act) PITNDPS Act १९८८ अन्वये प्रतिबंधक कारवाई करणे.

२२. Narcotics Drug and Psychotropic Substance (N.D.P.S.) कायद्यातील तरतुदीबाबत राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

२३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशाने मार्गदर्शक सूचना (DGPs Standing Order) निर्गमित करणे.

२४. शासन पोलीस महा /संचालक यांच्यावतीने विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स हे समन्वय सल्लागार तसेच नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील.

२५. Anti-Narcotics Task Force (ANTF) प्रत्येत महिन्याला प्रगती अहवाल मा. पोलीस महासंचालक यांना सादर करतील.

२६. विशेष पोलीस महानिरीक्षक हे शासनाच्या परवानगीने Anti-Narcotics Task Force (ANTF) साठी आवश्यक असणारे professional / Special Expert / Consultite services भाडे तत्वावर घेतील.

२७. विशेष पोलीस महानिरीक्षक Anti-Narcotics Task Force (ANTF) हे अपर पोलीस महासंचालक,गुन्हे अन्वेषण विभाग यांच्या अधिपत्याखाली काम करतील. व अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग हे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील.

२८. विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यमुल्यांकन अहवाल प्रतिवेदन अधिकारी (Reporting) म्हणून अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे हे प्रतिवेदीत करतील. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे पुर्नविलोकित (Review) करतील व अपर मुख्य सचिव (गृह) हे स्विकृती अधिकारी म्हणून राहतील. तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यमुल्यांकन अहवाल प्रचलित पध्दतीनुसार करण्यात येतील.

**(ई) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सची स्थापना करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ व आवर्ती खर्च:-**

अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सची स्थापन करण्यासाठी आवश्यक पोलीस उप निरीक्षक ते विशेष पोलीसमहानिरीक्षक यांची पदे शासन मंजूरीनंतर पोलीस महासंचालक कार्यालयातील आस्थापना शाखेकडून भरण्यात येतील . पोलीस हवालदार / सहा. पोलीस उप निरीक्षक ही पदोन्नत पदे असल्याने सदर पदे संबंधित घटकांकडून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील. तसेच पोलीस शिपाई ही पदे संबंधित घटकांकडून भरती प्रक्रीया करुन अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कार्यालयास वर्ग करण्यात येतील. प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी ही पदे पोलीस महासंचालक कार्यालयातील प्रशासन शाखेकडून भरण्यात येतील.

प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अधिपत्त्याखाली कामकाज करतील .

**(उ) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्ससाठी लागणाऱ्या खर्चाचा तपशील:-**

१) विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स यांचे कार्यालय व त्यांच्या पूणे व नागपूर घटकांच्या वाहनासांठी लागणारे इंधन, वाहनांची दुरुस्ती, देखभाल तसेच शस्त्र व दारुगोळ्याचा पुरवठा, संबंधित परिक्षेत्रीय कार्यालय यांच्याकडून करण्यात येईल.

२) विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच प्रशासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व भत्ते अदा करण्याबाबत त्यांच्या स्तरावर कार्यालय प्रमुख (Office Superident) यांची आहरण व वितरण अधिकारी ( DDO) म्हणुन नेमणूक करुन अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स यांना कंत्राटी पदे भरण्याकरिता नियुक्ती प्राधीकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

४) अंमली पदार्थ विराधी टास्क फोर्स स्थापन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळ, कंत्राटी मनुष्यबळ,वाहने व साधनसामुग्री तसेच त्याबाबत आवर्ती व अनावर्ती खर्चाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५) महाराष्ट्र पोलीस दलामध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स ANTF स्थापन करण्यास शासनाने दिलेल्या तत्वत: मंजुरी नुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०८३११२१५३६९३२९ असा आहे.. शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAHUL VIJAY KULKARNI

Digitally signed by RAHUL VIJAY KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=019d1a40755cacf50cb371c432c67afaec7da5aad928d966ad4270c6a4f1ac39, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=31493D4A6291F531ED8FD00972CCBFA0376623C7F6C38C3B848BFBE06685A219, cn=RAHUL VIJAY KULKARNI
Date: 2023.08.31 12:17:36 +05'30'

**( राहुल कुलकर्णी )**
**सह सचिव, महाराष्ट्र राज्य**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (गृह), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (विशेष), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) अपर पोलीस महासंचालक (नि.व.स) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
८) विशेष पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र सायबर, मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
११) व्यय-७, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई १३ अर्थसंकल्प शाखा (बीयूडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवड नस्ती (विशा-३)

दि.३१/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०२२/प्र.क्र.१५३/विशा-३ अ सोबतचे
परिशिष्ट " अ"

महाराष्ट्र राज्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स Anti-Narcotics Task Force (ANTF)

**परिक्षेत्रीय पोलीस उप अधीक्षक (कृती) (ANTF) यांचे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे असेल**

| पुणे ANTF विभाग | नागपूर ANTF विभाग |
|---|---|
| १. कोकण विभाग - पोलीस उप अधीक्षक (कृती) | १. अमरावती विभाग - पोलीस उप अधीक्षक (कृती) |
| > ठाणे ग्रा. | > अमरावती ग्रा. |
| > पालघर | > यवतमाळ |
| > रत्नागिरी | > बुलढाणा |
| > सिंधुदुर्ग | > अकोला |
| > ठाणे पोलीस आयुक्तालय | > वाशिम |
| > नवी मुंबई पोलीस आयुक्तालय | > अमरावती पोलीस आयुक्तालय |
| >मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय | |
| **२. कोल्हापूर विभाग - पोलीस उप अधीक्षक (कृती)** | **२. छत्रपती संभाजीनगर विभाग - पोलीस उप अधीक्षक (कृती)** |
| > कोल्हापूर | > छत्रपती संभाजीनगर ग्रा. |
| > सातारा | > जालना |
| > सांगली | > बीड |
| > सोलापूर ग्रा. | > उस्मानाबाद |
| > पुणे ग्रा. | > छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय |
| > पुणे पोलीस आयुक्तालय | |
| > पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय | |
| > सोलापूर पोलीस आयुक्तालय | |
| **३.नाशिक विभाग पोलीस उप अधीक्षक (कृती)** | **३. नांदेड विभाग- पोलीस उप अधीक्षक (कृती)** |
| > नाशिक ग्रा. | > नांदेड |
| > धुळे | > लातूर |
| > जळगांव | > परभणी |
| > अहमदनगर | > हिंगोली |
| > नंदुरबार | |
| > नाशिक पोलीस आयुक्तालय | |
| | **४.नागपूर/गडचिरोली विभाग · पोलीस उप अधीक्षक (कृती)** |
| | > नागपूर ग्रा |
| | > वर्धा |
| | > भंडारा |
| | > चंद्रपूर |
| | > गडचिरोली |
| | > अहेरी |
| | > गोंदिया |
| | > नागपूर पोलीस आयुक्तालय |